## प्रकरण 1 उदयोजक

जगातील एकूण देशांचे तीन प्रकारात वर्गीकरन केल्याचे दिसून येते. विकसित देश, विकसनशील देश, तर अविकसित (मागास) देश. यामध्ये विकसित देशांचा विचार केल्यास असे लक्षात येते की त्या देशांची औदयोगिक प्रगती झपाट्याने झाली आहे आणि याला कारणीभूत ठरलेली बाब म्हणजे त्या देशातील उदयोजकांची संख्या होय. म्हणजेच देशांच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत उदयोजकांचे कार्य महत्त्वाचे आहे.भारतासारख्या विकसनशील व मोठ्या लोकसंख्येच्या देशात मोठ्या प्रमाणावर उदयोजक निर्माण होणे अत्यंत आवश्यक आह

**उदयोजक उत्क्रांती :-**

उदयोजक हा शब्द इंग्रजीतील Entrepreneur या शब्दाचा मराठीतील पर्यायी शब्द आहे. Entrepreneur हा शब्द फ्रेंच भाषेतील "Entreprendre" या शब्दावरून निर्माण झाला आहे फ्रेंच भाषेमध्ये 'Entreprendre' या शब्दाचा अर्थ undertake असा आहे तर undertake या शब्दाचा मराठीत अर्थ सुरू करणे, एखादे काम हाती घेणे असा आहे त्यामुळे उदयोजक म्हणजे एखादे काम, कार्य सुरू करणारा किंवा हाती घेणारी व्यक्ती होय.

खालील तक्त्यांच्या आधारे उदयोजक कोणाला म्हटल जात तसेच उदयोजक या शब्दांची उत्क्रांती स्पष्ट होईल.

| शतक | उदयोजक संकल्पनेची उत्क्रांती |
|---|---|
| १६ वे | i) सैनिकी मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती<br>ii) कोणतेही धडाडीचे काम करणारी व्यक्ती |
| १७ वे<br>(1725) | 1) शासनाची कंत्राटे घेणाऱ्या व्यक्ती<br>ii) उद्योग व्यवसाय करणारी व्यक्ती<br>iii) धोका पत्करणाऱ्या व्यक्ती |
| 18 वे<br>१८०३<br>१८७६ | i) व्यावसायिक शेतकरी<br>ii) जे. बी. से - उत्पादन घटकांचा मोबदला भागवून स्वत साठी नफा मिळविणाऱ्या व्यक्ती.<br>iii) फ्रॉन्सेस वाल्कर - निधी पुरवून व्याज मिळविणे व व्यवस्थापकीय क्षमतेतून नफा मिळविणे. |
| १९ वे<br>१९३४ | संशोधक - उत्पादक घटकांचे संघटन करणारे<br>शुम्पीटर - नवनिर्मिती करणारे |

| | |
|---|---|
| १९६१ | मॅक्लेलैंड - माफक धोका स्वीकारणारे |
| 20. वें | नवनवीन उदयोग करणाऱ्या<br>जुने उदयोग नवीन पद्धतीने करणाऱ्या व्यक्ती |
| २१ वे | इंटरनेटवरून व्यवसाय / व्यापार करणारे कंपनी अंतर्गत उदयोजक<br>सोशीप्रेन्यूअर्स, ॲग्रीप्रेन्युअर्स, एज्युप्रेन्यूअर्स |

**उदयोजक या संकल्पनेची व्याख्या**

1) रिचर्ड कॉन्टिलॉन यांच्यामते “ उत्पादनाची साधने निश्चित' किमतीला खरेदी करून त्यांच्यापासून उत्पादन तयार करून ते अनिश्चित किमतीला विकणारी व्यक्ती म्हणजे "उदयोजक' होय.”

2) पीटर ड्रकर यांच्यामते "उदयोजक म्हणजे अशी व्यक्ती की, जी नेहमी बदलाचा शोध घेते बदलांना प्रतिसाद देते आणि त्याची संधी म्हणुन उपयोग करून घेते!'

3) जोसेफ पीटर यांच्यामते "उदयोजक म्हणजे नवनिर्मिती करणारी व्यक्ती होय.

**उदयोजक या संकल्पनेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे**

1) उदयोजक म्हणजे अशी व्यक्ती की जी नवीन उदयोग, उपक्रम अथवा व्यवसाय स्थापन करते

२) उत्पादनाचे विविध घटक एकत्रित करतात व त्यांना चालना देते.

3) उत्पादन घटकांना योग्य मोबदला देऊन स्वत:साठी उत्पादन' मिळवतात

4) नवीन उपक्रम सुरू करण्यातील धोका, जोखीम स्वीकारते

५) उदयोजक हा आर्थिक, मध्यस्थ असतो.

८) उदयोजकाला व्यवस्थापनाची सर्व कार्ये पार पाडावी लागतात.

7) नवनिर्मिती ही व्यावसायिक कामकाजाच्या कोणत्याही बाबीं संदर्भात असू शकते

8) उदयोजक हा बदलांकडे संधी म्हणून पाहता असतो

९) उदयोजक हा साधनांचे रूपांतर संसाधनामध्ये करत असतो.

10) उदयोजक नफा मिळविण्याच्या उद्देशाने उपक्रम सुरू करत असतो

**उद्योजकांची कार्ये :-**

1) नवनिर्मिती:- नवनिर्मिती हे उदयोजकाचे मुलभूत कार्य आहे. अशी नवनिर्मिती ही पुढील पाच मार्गांनी केली जाऊ शकते नवीन उत्पादन पद्धती, नवीन वस्तू, नवीन बाजारपेठ, नवीन संघटन नवीन कच्चा माल.

2) संधी शोधणे-:सामान्य लोक ज्याकडे संकट म्हणून पाहतात त्याकडे उदयोजक संधी म्हणुन पाहतात आणि त्या संधीचे व्यवसायात रूपांतर करतात पाणी प्रदुषण हे जरी संकट असले तरी सध्या ग्रामीण भागातही पाणी शुद्धीकरण  करून विकण्याचे अनेक व्यावसाय स्थापन झालेले आहे.

3) जोखीम स्वीकृती:-उद्योजकाला उपक्रमातील सर्व जोखीम स्वीकाराव्या लागतात. उदयोजकाला बाजारपेठेतील स्पर्धा, ग्राहकांच्या आवडी-निवडीतील बदल, तंत्रज्ञानातील वेगाने होणारे बदल, कामगारांची मानसिकता व सरकारी धोरणातील बदलांना सामोरे जावे लागते

४) निर्णय घेणे:- उदयोजकाला आपल्या उपक्रमासाठी वेळोवेळी अनेक प्रकारचे निर्णय घ्यावे लागतात योग्य निर्णयासाठी विलंब, लावून चालत नाही, तर घाईगडबडीने चुकीचे निर्णय घेता येत नाहीत निर्णय हे दुरदृष्टी ठेवून अचुकपणे घ्यावे लागतात निर्णयचे कार्य यशस्वीपणे पार पाडण्यासाठी उदयोजकांजवळ चांगली निर्णय क्षमता असावी लागते

5) निधीची उभारणी

उदयोजक स्वतःचे भांडवल व कर्जाऊ भांडवल या माध्यमातून आवश्यकते प्रमाणे निधी उभे करीत असतात कर्जाऊ भांडवल उभे करीत असताना योग्य प्रमाण, योग्य वेळ व योग्य व्याजदर इत्यादींचा विचार करावा लागतो." तसेच, वेळेवर कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी - उदयोजकांना पार पाडावी लागते

16) संसाधन संघटन :- संसाधने वेळेवर, व पुरेशा प्रमाणात योग्य किमतीत- एकत्रित करावी लागताता अनेक संसाधने ही दुर्मीळ असतात त्यामुळे उदयोजकांना योग्य पद्धतीने संसाधनांची जुळवाजु करून त्याचा महत्तम वापर करावा लागतो.

7) नेतृत्व करणे :- कार्यक्षम व प्रभावी नेतृत्वावरच उपक्रमाची प्रगती व यश अवलंबून असते. योग्य नेतृत्व उपक्रमातील मनुष्यबूळोन अधिक कार्यप्रेरणा दिऊन मांची कामगिरी उचावतात अनेक यशस्वी उद्योजकांनी त्यांच्याकडील नेतृत्व गुणांमुळेच त्याचे व्यवसाय नावारूपाला आणलेले आहेत"

8) जनसंपर्क:-

उद्योजकांच्या उपक्रमाचे संचालन संचालन करीत असताना समाजातील अनेक घटकांशी संबंध येत असतो पुरवठादार, गुतवणूक -दार, ग्राहक, समाज, सरकारी कार्यालये, बँका, विमासंस्था, वाहतूकदार जारिखानदार, कामगार इ. घटकांशी चांगला संपर्क ठेवावा लागतो.

9) रोजगारनिर्मिती :-

भारतासारख्या विकसनशील व मोठ्या लोकसंख्येक देशात रोजगारांची निर्मिती हे अत्यंत कठीण कार्य असते. मर्यादित साधनसामग्रीच्या साहाय्याने नवनवीन व्यवसायाची निर्मिती करणे हे देखील अवघड कार्य असते. नवनवीन व्यवसायनिर्मितीतून रोजगार निर्मिती होत असते. उद्योजक हे रोजगार निर्मितीचे महत्त्वाचे कार्य करणात

10) समतोल आर्थिक विकास :-

उद्योजकांना समतोल आर्थिक विकास साधण्याचे राष्ट्रीय कार्य पार पाडावे लागते विवशेषतः ग्रामीण भागाच्या विकासासाठी उद्योजकांना विशेष पुढाकार घ्यावा लागतो व प्रादेशिक विषमता दूर करण्याची

**यशस्वी उद्योजकाचे गुण 'पूर्ण करावे लागते,**

1) महत्त्वाकांक्षा :-महत्वाकांक्षा व्यक्तीना कोणतेही कार्य करण्यास प्रवृत्त करते, उत्साही बनविते, उपक्रम नव्याने सुरू करून यशस्वी करण्याची व नावलौकिक प्राप्त करण्याची महत्वाकांक उद्योजकांमध्ये असावी लागते.

2) आत्मविश्वास :-द्योजकांचा स्वतःच्या कामावर, क्षमतेवर घेतलेल्या निर्णयवर क्षमतेवर विश्वास असावा लागतो. उपक्रमाची उत्पादन विपणन, तंत्रज्ञान, मनुष्यबळ, वित्त इत्यादीबाबत निर्णय नम्रपणे घेण्यासाठी उद्योजकांकडे योग्य आत्मविश्वास गरजेचा असतो.

4) दूरदृष्टी :- भविष्यकाळाचा अचूक वेध घेण्याची क्षमता म्हणजे दूरदृष्टी होय पुढील 5 ते 10 वर्षीन उपक्रमाचे स्वरूप कसे असेल ग्राहकांच्या आवडीनिवडीत कसे बद्दल अपेक्षित आहेत बाजारपेठेतील परिस्थिती काय राहील, सरकारचे धोरण कसे असेल ईत्यादी घटकांचा दूरदृष्टीने विचार उद्योजकांना करता आला पाहिजे.

5) सकारात्मक दृष्टीकोन :- " उद्योजक हे नेहमी सकारात्मक असावे लागतात तरच इतर व्यक्ती त्यांच्याकडुन काही प्रेरणा घेऊ शकतात कोणतेही कार्य एक आव्हानच असते ते सकारात्मक विचारातून पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी उद्योजकांची असते

6) बांधीलकी :- व्यवसायाप्रती असणारी आपली बांधीलकी उद्योजकानी जपली पाहिजे. अशा बांधीलकीतून सर्वाच्या प्रती असणारी जबाबदारी त्यांना पूर्ण करावी लगते व्यवसायाला नफा मिळवून देत असताना अशा जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे

7) संवाद कौशल्य:- संवाद कौशल्यातून सर्व घटकांबरोबर चांगले संबंध, प्रतापित करता येतात. व्यवसायाची व व्यवस्थापनाची सर्व कार्ये पूर्ण होण्यासाठी उ उद्योजकांकडे या गुणांची गरज असते

8) जागरुकता :- उद्योजक हा सतत जागरुक असला पाहिजे वेळ, आर्थिक व्यवहार, पर्यावरण, वस्तुदर्जा, ग्राहकांच्या गरजा व आवडी-निवडी, मध्यस्थांची उपलब्धता व सहकार्य, स्पर्धकांचे डावपेच, बाजारातील परिस्थिती याबाबत उद्योजक नेहमी सतर्क असला पाहिजे

9) व्यवहार्यता :-उद्योजकाने व्यवसायातील सर्व कार्यावर व घटकाबाबत नेहमीच व्यवहार्य दृष्टिकोन ठेवला पाहिजे, यामुळे उद्योजकांना अवास्तव व चुकीची जोखीम स्वीकारावी लागत नाही.

10) धैर्य:- उद्योग व्यवसायात अनेक कठीण प्रसंग निर्माण होत असतात अनपेक्षितपणे अपयशाला सामोरे जावे लागते. काही वेळा नुकसान, चढ-उत्तार सहन करावे लागतात. अशा वेळी उद्योजकांना अशा संकटांचा धैर्याने सामना केला पाहिजे

11) क्षमता :- काम करवून घेण्याची क्षमता, निर्णय क्षमता, समजून सांगण्याची क्षमता, प्रेरणा देण्याची क्षमता, संधी साधण्या ची क्षमता इत्यादी क्षमता उद्योजकांकडे असाव्या लागतात

12) चारित्र्य :- उद्योजकांना अनेक नीतीमूल्ये पाळावी लागतात प्रामाणिक संचोटी, सौजन्य, शिष्टाचार, समाजात मिसळण्याची वृती, वाणीत शिस्त,निष्ठा, भावनिक स्थैर्य, निर्माण करावे लागते. म्हणजेच उद्योजक हा चारित्र्य संपन्न असावा लागतो.

**उद्योजकांचे प्रकार**

**अ) कॉलरेन्स डॉन हॉफ यांनी सांगितलेले प्रकार**

1) नवनिर्मितिवादी उद्योजक :- उद्योजक हे काहीतरी नवीन करन्याच्या प्रेरणेने उत्साहित झालेले असतात आणि यातूनच ते एखादा उपक्रम व्यवसायिक तत्त्वावर करतात

2) अनुकरणवादी उद्योजक :- अशा प्रकारचे उद्योजक हे दुसऱ्या उद्योजकांचे अनुकरण करीत असतात नवीन काहीतरी करण्यापेक्षा प्रस्थापित मार्गाने मर्यादित जोखीम स्वीकारून अल्प नफा मिळविण्यामध्ये असे उद्योजक समाधान मानजात

3) सावध उद्योजक :-असे उद्योजक अतिशय सावधपणे, चालाकी बद पध्दतीने व्यवसाय चालवित असे उद्योजक आळशी व उदासीने वृत्तीचे असतात अतिशय संथ गतीने कार्ये करणारे असतात.

4) निष्क्रिय उद्योजक :- असे उद्योजक कोणत्यारी उत्कृष्ट संधीचा फायदा घेण्यासाठी व व्यवसायात काळानुरूप बदल घडवून आणण्यासाठी ते अजिबात तयार नसतात,

**ब) लिंगभेदाच्या आधारे उद्योजकांचे प्रकार**.

1) पुरुष उद्योजक:-पुरुष उद्योजक हे सुशिक्षित, कष्टाळू- जोखीम पत्करणारे, साहसी व्यक्ति असतात शारीरिक क्षमता, महत्वाकांक्षा व सर्व क्षेत्रात काम करण्याची प्रवृत्ती पुरुषांमध्ये अधिक असते.

2) स्त्री उद्योजक :- शिक्षणाचा प्रसार, वाढती महत्वाकांक्षा, घराबाहेर पडण्याची 'इच्छा व स्वातंत्र्य आणि कुटुंबाची गरज यामुळे स्त्री उद्योजकांची संख्या वेगाने वाढत आहे. सध्या स्त्री उद्योजक हा पारमारिक उद्योगामध्ये कार्यरत असल्याचा दिसते.

**क) तंत्रज्ञानाच्या आधारे उद्योजकांचे प्रकार**

i) तांत्रिक उद्योजक :- तांत्रीक उद्योजक हे व्यवसायासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या संशोधनाचा वापर करतात. उच्च तांत्रिक शिक्षण घेतल्यामुळे असे उद्योजक नवनवीन उद्योग करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतात.

2) बिगर-तांत्रिक उद्योजक:- अशा उद्योजकांना कोणत्या प्रकारचे तांत्रिक ज्ञान असत नाही ज्या व्यवसायांसाठी तांत्रिक ज्ञानाची गरज नाही असेच उद्योग व्यवसाय हे उद्योजक करीन असतात

3) पेशावार उद्योजक :- अशा उद्योजकांचा विविध उपक्रम स्थापन करणे व नंतर तो नफा घेऊन दुसऱ्यांना विकणे हा पेशा असतो असे उद्योजक आपली कल्पकता व अनुभव वापरून नवीन उपक्रम सुरू करतात व इतरांना विकून टाकतात

**ड) भौगोलिक क्षेत्राच्या आधारे उद्योजकांचे प्रकार**

1 ग्रामीण उद्योजक :- जे उद्योजक आपाला उपक्रम ग्रामीण भागात स्थापन करतात त्यांना ग्रामीण उद्योजक असे म्हणतात-

२) शहरी उद्योजक :- जे उद्योजक आपाला उपक्रम शहरी भागात स्थापन करतात त्याना शहरी उद्योजक असे म्हणतात-

3) विदेशी उद्योजक:- जे उद्योजक एका देशातून दुसऱ्या देशांत जाऊन व्यवसाय स्थापन करतात त्यांना विदेशी उद्योजक, असे म्हणतान

**इ) व्यवसाय प्रकाराच्या आधारे उद्योजकांचे प्रकार**

1) व्यापारी उद्योजक:- असे उद्योजक हे इतरांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची विक्री करतात आणि अभिकर्ते, वितरक, घाऊक व किरकोळ व्यापा-यांचा यामध्ये समावेश असतो

2) औद्योगिक उद्योजक :-विविध प्रकारच्या वस्तूचे उत्पादन करणारे तसेच अपारंपा रिकं उद्योगात कार्यरत असणाऱ्या उद्योजकाना औद्योगिक उद्योजक असे म्हणतात

3) कृषी उद्योजक:-शेती व शेती पुरक व्यवसाय करणाऱ्या उद्योजकाना कृषी उद्योजक म्हणतात असे उद्योजक  बी लीगाणे, खते किटक नाशके प्रगत तंत्र व अवजारे वापरून शेती करतात

4) सेवा उद्योजक :-पर्यटन, वाहतूक, मनोरंजन, बँका, विमा, इंटरनेट, मोबाइल सेवा, शिक्षण ई. सेवा पुरविणाऱ्या व्यक्तीना सेवा उद्योजक म्हणतात

**उद्योजक निर्माण होण्यातील अडथळे**

१) भांडवल उभारणीतील अडथळे :-भाडवलाशिवाय कोणताही उद्योग व्यवसाय सुरु कराता येत नाही भारतासारख्या विकसनशिल देशात भांडवल पुरवठा करणाऱ्या संथाचे जळे कमी आहे. अशा अडचणीमुळे सहजासहजी भांडवल पुरवठा होत नाही

2) स्पर्धा : बाजारपेठेत आलीकडे तीव्र व गळेकापू स्पर्धा आहे. अशा या स्पर्धेत उद्योजकांना आपल्या प्रकल्प उभा करावयाचा असतो त्यासाठी उद्योजकाला नवनवीन कल्पना शोधाव्या लागतात

३) ज़ोखीम :- उद्योजक होऊ इच्छीणारी व्यक्ती उद्योग व्यवसाय उपक्रमात पेसा गुतवून एक प्रकारे जोखीमच स्वीकारत असतो. दुर्दैवाने व्यवसाय यशस्वी झाला नाही तर संपूर्ण कारकिर्द धोक्यात येऊ शकते.

4) दुरदृष्टीचा अभाव :- दुरदृष्टीमुळे भविष्य काळाचा अचुक वेध घेऊन उद्योग-व्यवसाय यास्वक्षणो स्थापित करण्यासाठी योजना तयार करता येतात परंतु उद्योजकांकडे दुरदृष्टी नसेल तर उद्योग-व्यवसाय उभारणी मध्ये अडचणी येऊ शकतात

(5) आत्मविश्वासाचा अभ्यास :-नवीन उपक्रम यशस्वी करण्याचा आत्मविश्वास ज्या व्यक्तीमध्ये आहे तीच व्यक्ती उद्योजक होऊ शकते यशस्वी उद्योजक हे प्रत्येक गोष्ट आत्मविश्वासाने करताना आढळतात. आत्मविश्वासाचा अभाव असेलतर  कोणत्याच कामाची सुरुवातंचय होऊ शकणार नाही.

6) योग्य निर्णयाचा अभाव:- उद्योजकांना निर्णय हे अचूक व वेळेवर घ्यावे लागतात योग्य निर्णय घेण्यासाठी विलब लावून चालत नाही किवा घाईगडबडीने चुकीचे निर्णय घेता येत नाही. योग्य वेळी योग्य

निर्णय घ्यावे लागतात. परतू नवीन उद्योजकांकडे निर्णय कौशल्य नसेल तर अडचण निर्माण होऊ शकतात.

7) चौकटीबाहेरचा विचार नाही, नवीन उपक्रमासाठी नवीन व वेगळा विचार करावा लागतो संध्यांच्या सध्याच्या व्यवसायापेक्षा काहीतरी वेगळा मार्ग व विचार वापरून नवीन पद्धतीने उपक्रम स्थापन करता येऊ शकतो. परंतु नवीन उद्योजकांकडे  चौकटी बाहेर जाऊन विचार करण्याची योग्यता नसेल तर अड्याळे येऊ शकतात.

8) अपरीचीत गोष्टीशी सामना:- नवउद्योजकांना अनेक अपरिचित अनपेक्षित गोष्टीशी  'सामना करावा लागतो' आपला व्यवसाय किती काळ टिकेल ? तो किती काळ फायदेशीर ठरेल ग्राहकांना आपला व्यवसायातील वस्तू व सेवा आवडती का? गुतवणुकीवर योग्य मोबदला मिळेल का? नैसर्गिक आपत्ती इ. उद्योजकांना  अनेक गोष्टीशी सामना करावा लागतो.

9) सामाजिक अस्वीकार :- नवीन उपक्रम स्थापन करीत असताना समाजावर तसेच स्थानिक लोकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय झाल्यास  उपक्रमास मोठ्या प्रमाणावर विरोध होतो  त्यामुळे नवीन उपक्रम समाजमान्य असावा

10) योग्य संघ उभारणीतीलअडचणी:- उद्योजकांना सामूहिकपणे आपल्या कौशल्याचा वापर व्यवसाय उभारणीसाठी करणाच्या मनुष्यबळाचा एक संघ तयार करावा लागतो उद्योजकांना कोअर टीम व्यवस्थितपणे उभा करता आली नाही तर उपक्रम सुरू होण्यात अनेक अडथळे निर्माण होतात

11) सरकारी प्रोत्साहनाचा अभाव :-  ज्या ठिकाणी सेवा-सुविधा, सवलती पुरविल्या जात नाहीत त्या ठिकाणी तुलनेने व्यवसाय स्थापन करण्यामध्ये अनेक अडथळे निर्माण होतात

**आधुनिक युगात सध्याच्या उद्योजकांपुढील आव्हाने**

1) आर्थिक आव्हाने :-

व्यवसायात वित्तपुरवठा कमी झाल्यास व्यवसाय अडचणीत येऊ शकतो. कमी भाडवलीकरण किंवा जादा भाडवलीकरण हे दोन्ही व्यवसायासाठी धोकादायक असते त्यामुळे वित्तपुरवठा योग्य ठेवणे हे प्रत्येक व्यवसायापुढील महत्वाचे आव्हाण आहे.

2) सामाजिक आव्हाने :-

उद्योजकांना विविध प्रकारची सामाजिक आव्हाने स्वीकारावी लागतात. समाजाप्रती असणारी जवाबदारी विविध मार्गीनी पूर्ण करावि लागते. सरकारने यासंदर्भात कायदे केल्यामुळे आशी आव्हाने पूर्ण करणे बंधनकारक झालेले आहे.

3) तांत्रिक आव्हाने :-आधुनिक युगात तंत्रज्ञान अत्यत वेगाने बदलत आहे त्याप्रमाणे | उद्योजकांना बदलावे लागेल तसेच त्यांनाही संशोधनावर मोठया प्रमाण खर्च करावा लागेल त्यासाठी स्वतंत्र संशोधन व विकास विभाग निर्माण करून नवनवीन तंत्रज्ञान वस्तु, उत्पादन पद्धतीती  कच्चा माल, प्रक्रिया सुविधा यांचा शोध घेतला पाहिजे.

4) राजकीय आव्हाने :-राजकीय सत्ता बदलली की उद्योग-व्यवसायावर अनुकूल प्रतिकूल परिणाम होत असतो उद्योजकांना असे परिणाम सहन करावे लागतात. आपल्या व्यवसायावर राजकीय अनिष्ट परिणाम होऊ नये म्हणून सतत दक्ष राहावे लागते.

5) जागतिक आव्हाने :-जागतिकीकरणाच्या युगामध्ये उयोजकांना जागतिक स्तरावरील आव्हाने स्वीकारावी लागतात. आपला व्यवसाय जागतिक स्पर्धत टिकून राहील इतकेच नव्हे तर तो अग्रेसर राहील अशा योजना तयार कराव्या लागतात जागतिक बाजारठेत आपल्या व्यवसायाची एक खास प्रतिमा निर्माण करावी लागेल.

6) मानवी संसाधनांची आव्हाने :-कुशल मनुष्यबळाला योग्य कार्य उपाच्ब्ध करून देण्याचे आव्हान सध्याच्या उद्योजकांपुढे आहे असंख्य उद्योजक मनुष्यबळा एव  रोबोचा वापर करीत आहेत. अशा परिस्थितीत मानवी संसाधने उदूक्त करण्याचे आव्हान उद्योजकांपुढे असणार आहे.

7 प्रेरणा व समर्पण:-व्यवसाय टिकविण्याची व त्याची वाढ - विस्ताराची प्रेरणा उद्योजकांना बाळगावी लागेल तसेच जुन्या गोष्टीचा त्याग आणि नवीन गोष्टींचा स्वीकार अशी प्रेरणा व समर्पण कायम राखावी लागतील

8) विपणन व्यूहरचना :-सध्या उद्योजकांना आंतरराष्ट्रीय विपणनाचा विचार करावा लागतोच त्याचबरोबर विणणनाच्या बदलत्या स्वरूपाचाही अंगीकार करावा लागतो ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण ककरण्याचे मोठे आव्हान सध्याच्या उद्योजकांना स्वीकाराने लागेल.

9) नावीन्याचा ध्यास :-सध्याच्या उद्योजकांना सतत नावीन्याचा ध्यास घ्यावा लागतो. नवनवीन वस्तू व सेवा, नवीन बाजारपेठा  नवीन उत्पादन  नवीन संघटन रचना, नवीन कच्चा माल, नवीन व्यवसाय, नवीन ठिकाण नवीन प्रक्रिया इत्यादी विकसित कराव्या लागतील

10) पर्यावरणपूरकता :-उद्योजकांना पर्यावरणास अनुकूल ठरणाऱ्या वस्तू व सेवा निर्माण कराव्या लागतात व्यवसायापासून कोणते प्रदूषण होणार नाही. व्यवसाय - हा ऊर्जा बचत करणारा व अपारंपरिक ऊर्जास्त्रोत असवा : पुनर्वापर करता येतील अशी उत्पादने व्यवसायाने निर्माण करावी लागतील

11) अचुकता :-कोणत्याही प्रक्रियेत कार्यात किंवा पद्धतीत दोष राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी लागेल सध्या ग्राहक दर्जाला महत्व देत असल्यामुळे अचूकतेशिवाय दर्जा गाठणे शक्य होणार नाही

12) नीतिमूल्यांची जपणूक :-नाफेखोरी, मक्कतेदारी, कामगारांची मिळणूक, मालमत्तेचा गैरवापर, ग्राहकांचे आरोग्य बिघडविणाऱ्या वस्तू व सेवा इ. बाबीनंवर मात करण्यासाठी नीतिमूल्यांची जपणूक करायचे आव्हान उद्योजकाना पेलावे लागेल.